# प्रकरण पाचवे

# उ प सं हा र

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

प्राचीन मराठी वाङ्•मयात महानुभावाच्या गद्य लेखनाला अत्यंत महत्त्व आहे. या गद्यातून समाजजीवनाचे जे आविष्कार स्पष्ट झालेले आहेत ते अभ्यासनीय आहेत. प्रारंभीच्या काळातही या संप्रदायातील लेखककवींची ही कामगिरी मराठी वाङ्•मयाच्या दृष्टीने भरीव आणि मोलाची ठरलेली आहे. विशेषत: या लेखनासाठी माध्यम म्हणून मराठी भाषेचा केलेला स्विकार सर्वच दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. पंथाच्या तत्त्वासाठी लिहीले गेलेले हे वाङ्•मय भाषेच्या माध्यमामुळे समाज जीवनाशी एकरुप झाले. सामाजिकतेचा हा पहिलाच स्पर्श या वाङ्•मयाला समाजसापेक्ष करण्यास उपकारक ठरलेला आहे.

साहित्यातून घडणा-या समाज जीवनाचा आविष्कार विविधांगांनी होत असतो. ही विविधांगे काळानुसार, साहित्य निर्मितीच्या परिस्थितीनुसार वेगवेगळी असू शकतात. कारण मानवी समाज जीवन नेहमीच बदलत असते. त्यामुळे हे घटकही बदलतात. अर्वाचीन काळातील साहित्य व समाज यांचा विचार करावयाचा झाल्यास आपणाला या काळातील प्रणालींचा विचार करावा लागतो. असा विचार आपणास पुढील काही स्वरुपातून मांडता येतो. उदा. साहित्य व मार्क्सवाद, साहित्य व प्रचार, सामाजिक बांधिलकी अशा अनेक अंगांनी हा विचार आपल्याला अभ्यासता येतो. प्रकरण दोन मध्ये याच संदर्भात चर्चा आलेली आहे. आधुनिक काळातील बदलते समाज जीवन व त्यानुसार निर्माण झालेले नवे रुपवादी स्वरुप येथे लक्षात घेतले आहे. प्राचीन साहित्याच्या संदर्भात या विचारांना फारसे स्थान नसले तरी काहीप्रमाणात या प्रणाली लक्षात घ्याव्या लागतात. उदा. सत्यता अथवा नैतिक विचारांची जाणीव ही जशी आज आहे तशीच ती गतकाळातही विचारात घेतली जात होती. कारण पूर्वीपासून साहित्य हे सामाजिक संस्कृतीचे अंग म्हणून ओळखले

जाते. तो एक सांस्कृतिक वारसा असतो. त्यामुळे संस्कृति संवर्धनाच्या बाबतीतील गतकालीन साहित्याचे स्वरुप काय होते. ते समजण्यास यातून मदत होते.

साहित्यातील सामाजिक वास्तवतेचेही महत्त्व याच दृष्टीने लक्षात घ्यावे लागते. बारीक-सारीक तपशीलातून वास्तवतापूर्ण अशी साहित्य निर्मिती होत असते. तपशीलवार वर्णने हे वास्तवपूर्ण साहित्य निर्मितीला उपयुक्त होत असतात. या दृष्टीने महानुभावीय गद्यांचा विचार केला तर हे साहित्य या कारणाने अधिक वास्तव आहे. असे मानावे लागते. तत्कालीन समाजाचे वास्तवपूर्ण चित्रण या गद्यातून अगदी सहजतेने झालेले आढळते. तसेच महानुभावी वाङ्मयातील सत्य-नितिमत्ता व प्रसाराचे स्वरुप लक्षात घेतले तर या प्रेरणांचा येथे आविष्कार झालेला आढळतो.

स्मृतिस्थळ व दृष्टांतपाठ यातून आपणापुढे जी सामाजिकता उभी राहते ती याच स्वरुपाची आहे. यातील लेखन प्राचीन काळाचे चित्रण करणारे आहे. पण ते अधिक वास्तवपूर्ण व तपशीलवार आहे. तपशीलांच्या सूक्ष्मतेने यात अधिक भरीवपणा आला आहे. तत्कालीन समाजातील राजवटी, विद्या-शास्त्र कला-संगिताची झालेली उन्नती हे एकेकाळी यादव साम्राज्याचे वैभव होते पण काळाच्या बदलाबरोबर यात कशी अधोगती झाली. तसेच परिस्थितीत कसा बदल घडला याचे सूक्ष्मतम स्वरुप स्मृतिस्थळासारख्या ग्रंथातून आपणापुढे उभे राहते. विशेषत: दिशाहीन समाजाचे चित्र आपणापुढे यातून उभे राहते. सर्वच समाज जीवन विस्कळीत झाल्याचे आढळून येते. राजकीय अस्थिरता व धार्मिक वर्चस्व अशा काहीशा विचित्र अवस्थेत हा समाज सापडला असल्याचे दिसते. यातच मुस्लिमांचे आक्रमण व त्यामुळे निर्माण झालेले धर्मसंकट येथे स्पष्ट होते. धार्मिक विचारांच्या आहारी गेल्याने यादवराजे

त्या काळात पूर्ण शौर्यहीन झाल्याचे दिसते. त्यातच दुष्काळ व चोर-दरोडेखोरी यामुळे या जनतेची संपत्तीक स्थिती पूर्ण खालावलेली होती. याचा परिणाम म्हणून तत्कालीन लोकजीवन अत्यंत साधे बनलेले होते.

विविध धार्मिक विधी व चालीरीती यातच तत्कालीन लोकांच्या जीवनाची इतिकर्तव्यता मानली जात होती. समाजातील विद्वानवर्ग तर केवळ धर्मचर्चेत रंगलेला दिसतो. अशा विविध जाणिवातून स्मृतिस्थळातील सामाजिकतेची अभिव्यक्ती झालेली आढळते. या दृष्टीने स्मृतिस्थळातील लेखन हे वास्तववादी लेखनाचा आदर्श म्हणून स्वीकारावे लागते. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीचे अधिक सूक्ष्म स्वरूपही आपल्यासमोर येते.

महानुभावीय ग्रंथकारांनी पंथाच्या आचारधर्माचा, तत्त्वज्ञानाचा प्रसार व्हावा या जाणिवेतून लेखन केले. पण त्यातील वास्तवता, सत्यता व तपशीलाचे बारकावे यामुळे हे साहित्य आजच्या सामाजिक व वाङ्मयीन विचारप्रणालीतही महत्त्वाचे ठरते. हे या लेखनाचे मोठेपणाच मानावे लागेल. तात्त्विक लेखनाप्रमाणे हे साहित्य कलात्मकतेच्या बाबतीही महत्त्वपूर्ण आहे. त्या दृष्टीने दृष्टांतपाठाचे लेखन स्वरूप व दृष्टांतकथा महत्त्वाच्या आहेत.

स्मृतिस्थळातून स्पष्ट झालेले सामाजिकतेचे स्वरूप हे वैचारिक तसेच तात्त्विक स्वरूपाचे आहे. पंथातील श्रेष्ठ व्यक्ती येथे केंद्रस्थानी असल्याने पंथीय दृष्टीच येथे प्रभावी झालेली दिसते. यातून समाज-धर्म अथवा इतर स्वरूपाचे जे वाद उपस्थित झालेले आहेत ते पंथाच्या विचारात आहे. पंथ मर्यादा येथे पाळलेली आहे. मात्र वाद-विवाद-चर्चा यांना त्यातून निश्चित स्थान मिळालेले आढळते. या दृष्टीने हे लेखन वास्तवपूर्ण असेच झालेले आहे.

दृष्टांतपाठातील लेखन हे कथात्मक स्वरूपातून मांडले गेलेले आहे. त्यातील दृष्टांत म्हणजे लहान लहान "स्फुट" कथाच आहेत. त्यामुळे हे लेखन आधुनिक लेखनशैलीनुरूप अनुभवता येते. यातील बहुतांशी दृष्टांत हे लोकजीवनाच्या सानिध्यातून घेतले आहेत. त्यामुळे या लेखनाला लोकजीवनाची खूपमोठी पार्श्वभूमी लाभलेली आहे. हे या दृष्टांताचे एकप्रकारचे सामर्थ्यच आहे. दृष्टांत सोपे करून सांगताना घेतलेली उदाहरणे त्या काळाच्या समाज रचनेचे योग्य प्रतिनिधित्त्व करतात हेच त्यांचे महत्त्व आहे व ही त्यांची सामाजिक फलश्रुती आहे.

दृष्टांतामुळे या गद्य लेखनाला कथात्मक सौंदर्य प्राप्त झाले आहे. त्यात मानवी स्वभावाच्या सूक्ष्म छटांचे स्पष्ट दर्शन घडते. तत्कालीन समाजदर्शन आणि मानवी मनाच्या अनेक छटा यात चित्रित झालेल्या आहेत. त्यामुळे हा ग्रंथ धर्म संप्रदायाच्या परंपरेत जसा बसतो तसाच तो ललित साहित्याचे विलोभनीय स्वरूप म्हणूनही महत्त्वाचा ठरतो. यातील सामाजिकतेची अभिव्यक्ती शोधताना त्यातील लालित्यपूर्ण लेखन व कथात्मक सौंदर्य समोर ठेवूनच ते शोधले आहे. केशिराजांच्या या दृष्टांताच्या विवेचनातून तत्कालीन समाजाचे विविधांगी दर्शन आपणांस घडते. हे दर्शन अत्यंत यथार्थ व वास्तवपूर्ण आहे. समाजात चालणारे विविध व्यवसाय, अठरापगड जाती, त्यातून निर्माण झालेली जातिव्यवस्था येथे आभ्यासली आहे. विविध व्यवसाय करणारे लोक यात आढळतात. कुटूंब व्यवस्था. त्यातील नात्यागोत्याचे, पतीपत्नीचे संबंध अशा अनेक स्वरूपाचा विचार सामाजिक जाणिवातून लक्षात घेतला आहे.

तत्कालीन समाज जीवनात स्त्री जीवनाची विविध स्वरूपे आढळतात. गृहिणी, पतिव्रता, बालविधवा, विरहीणी अशा कितीतरी स्त्री

व्यक्तिरेखा दृष्टांतातून स्पष्ट झालेल्या आहेत. त्यांचे सामाजिक स्थान व महत्त्व स्पष्ट करण्याचा, तसेच त्यांच्या व्यथा वेदना जाणून घेण्याचाही प्रयत्न केलेला आहे. स्मृतिस्थळातही स्त्रियांचे जीवनमान अभिव्यक्त झालेले आहे. त्यातून स्त्रियांचे चाकोरीबध्द जीवनमान व तसेच स्त्रियांवर लादलेले निर्बंध लक्षात येतात. या काळात स्त्रियांचे स्वातंत्र्य नष्ट झालेले होते व अनेक नियमांची बंधने त्यांच्यावर लादलेली होती. त्यातून स्त्रियांच्या जीवनाचा कोंडमारा कसा झाला होता हे लक्षात येते.

या दोनही ग्रंथातून अभिव्यक्त होणारे स्त्रीजीवन व सांस्कृतिक समाज-जीवन लक्षात घेतले आहे. या काळात समाजात राजकीय स्थिरता नसल्याने कलेचा व संस्कृतिक जीवनाचा व्हावा तितका विकास झालेला आढळत नाही. तरीपण सांस्कृतिक जीवनाशी निगडीत असलेले खेळ, विविध चालीरिती याही काळात रुढ असल्याचे दिसते. गायक, भाट, स्वैंपाकी, गुलामी यासारख्या गोष्टी तत्कालीन समाजाचे व्यापकत्त्व आपल्यापुढे उभे करुन जाते. सांस्कृतिक जीवनाचाच हा एक भाग मानावा लागेल. समाज कसा जगत होता व त्या समाजात काय काय पध्दती रुढ होत्या हे या सांस्कृतिक स्वरुपातून आपणापुढे स्पष्ट होण्यास मदत होते.

एकंदरीत विस्तृत अशा सामाजिक अभिव्यक्तीचे, जीवनाचे प्रत्ययकारी व वास्तवपूर्ण दर्शन आपणांस या दोन्हीही ग्रंथांतून घडते. त्यामुळे त्या काळचा समाज प्रत्यक्षपणे जिवंत उभा करण्याचे सामर्थ्य या ग्रंथांना लाभलेले आहे. हे या लेखनाचे महत्त्व आहे. सामाजिक, राजकिय, घरगुती, धार्मिक, वैचारिक, सांस्कृतिक जीवनाचे वास्तवपूर्ण, यथार्थ व तपशीलवार चित्रण सूक्ष्मपणे या दोनही ग्रंथात उमटलेले आहे. हे अशा अनेकदृष्टींनी हे दोनही ग्रंथ अनन्यसाधारण ठरलेले आहेत. सहजपणे

घडलेले वास्तवपूर्ण समाजीवन हे या ग्रंथाचे फारमोठे सामर्थ्य आहे. त्यामुळेच हे दोनही ग्रंथ म्हणजे तत्कालीन समाज जीवनाचे जिवंत चित्रण वाटते. एकीकडे वैचारिक निवेदन, नीतीबोध तर दुसऱ्या-बाजूने समाजजीवनाचे बारकावे अशा दोनही बाजू येथे समर्थपणे व्यक्त झालेल्या आहेत. हे या लेखनाचे सामर्थ्य आपणांस मान्य करावे लागते.

या सामर्थ्यपूर्ण लेखनाबरोबर यातील समाज जीवनाच्या चित्रणाला काही मर्यादाही पडलेल्या दिसतात.

महानुभावी संप्रदायाचे ग्रंथकर्ते हे संप्रदायाच्या मर्यादेत राहूनच लेखन करीत होते. संप्रदायाचे नियम लक्षात घेऊन या ग्रंथकर्त्यांना जीवनाचा स्वीकार करावा लागला. समाजात वावरतानाही त्यांनी ही तत्त्वे पाळली होती. त्यामुळे समाज जीवनाचे चित्रण काहीअंशी अधुरे झाल्या-सारखे वाटते. विशेषत: या दोन ग्रंथातील सामाजिक जीवनाचे स्वरूप लक्षात घेतले म्हणजे त्यात तत्कालीन समाजातील सण-उत्सवाचे चित्रण येत नाही. सर्वत्र एक विषण्णतेची छाया निर्माण झालेली आढळते. याचे कारणही वर दिल्याप्रमाणे पंथीय चाकोरीतील जीवनदृष्टी असावी असे म्हणता येईल.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे महानुभावी संप्रदाय हा पूर्णपणे सन्यासमार्गी होता. त्यामुळे त्यांच्या चित्रणात विरक्तीचाच अधिक प्रभाव जाणवतो. सुखावह जीवन स्वरूपापेक्षा वेगळे चित्रण त्यात अधिक येते. तीर्थयात्रा करणे, धार्मिक कार्यात सहभागी होणे यासारख्या गोष्टींची वर्णने या लेखनातून अधिक आलेली दिसतात. त्यांचे विद्वानही याच प्रकारचे वादविवाद करताना आढळतात. धार्मिकवृत्तीच्या विचारांनाच अनुसरून धर्मवार्ता करणे यासारख्या काही मर्यादा लेखनातून आलेल्या आढळतात.

अशा काही मर्यादा असल्या तरी या लेखकांची ही गद्य साहित्य निर्मिती अनेक दृष्टीने मोलाची व मूलगामी स्वरूपाची आहे. कारण त्यातून त्यांनी केलेले चित्रण हे सत्यस्थितीला धरून केलेले आहे. लेखनात कोणताही कृत्रिमपणा या लेखकांनी येऊ दिलेला नाही. हे या लेखनाचे आणखी एक प्रकारचे सामर्थ्यच मानावे लागते. तसेच तत्कालीन समाजात बोलली जाणारी भाषा स्वीकारल्याने यातील लेखन अधिक लोकसंस्कृतीच्या जवळ गेले आहे. त्याच लोकांचे शब्द, म्हणी वाक्प्रचार याचाही या लेखनात त्यांनी समावेश केल्याने संपूर्ण निवेदनाला सामाजिकतेचे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. अशा विविधतेतून स्मृतिस्थळ व दृष्टांतपाठातील सामाजिकतेचे स्वरूप आपणापुढे उभे राहते. त्यावरून त्याबाबतचे पुढील काही निष्कर्ष आपल्या हाती येतात.

## निष्कर्ष:

अ) तत्कालीन समाजाची स्थितिगती त्यांच्या परंपरा, खाणी-पाणी उद्योग व्यवसाय, व्रते अशा अनेक घटकांचे चित्रण तपशिलवारपणे रेखाटलेले आहे. ते वास्तवतापूर्ण व यथातथ्य आहे. त्यामुळे या लेखनाला वास्तववादी लेखनाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

ब) त्यावेळच्या लोकांची भाषा येथे लेखनासाठी स्वीकारलेली आहे. त्यामुळे लोकजीवनाचा आविष्कार त्यातून आलेल्या वाक्प्रचारातून, म्हणीतून स्पष्टपणे झालेला आहे. समाज जीवनातील अनेक दृष्टांत व दाखले येथे स्वीकारलेले आहेत. त्यामुळे अनेक लोककथांचा अविष्कार या गद्य साहित्यातून झालेला आढळतो.

क) महानुभावी संप्रदायातील लेखक हे सन्यासमार्गी असल्याने या लेखनात जीवनाच्या आनंदायीक्षणाचे चित्रण अत्यल्पप्रमाणात येते. त्यामुळेच या दोनही ग्रंथातून तत्कालीन समाज जीवनातील सण-उत्सवाचे चित्रण आलेले नाही.

ड) या दोनही ग्रंथातील समाजचित्रणात निवेदन आकर्षक स्वरूपात आलेले आहे. बारकाव्याने समाजजीवनाचे केलेले चित्रण हे या गद्यात्मक लेखनास अधिक सामर्थ्ययुक्त करण्यास उपयुक्त ठरलेले आहे.

ढ) पुढील काळात बखरगद्य मराठीत निर्माण झाले, विकसित झाले. त्यातील गद्यलेखनशैलीच्या पाऊलखुणा महानुभावीय "लीळाचरित्र" या ग्रंथात जशा आढळतात तशाच या "स्मृतिस्थळ" व "दृष्टांतपाठ" या ग्रंथातही आढळतात हे आवर्जुन ध्यानात येते.

••••••